Notice is hereby given to the public in general and in particular to the Borrowers, Co borrowers and Guarantors that the below described immovable property mortgaged to the Secured creditor, the physical possession of which has been taken by the Authorised Officer of Equitas Small Finance Bank Ltd., will be sold on 26-09-2023 "AS IS WHERE IS" "AS IS WHAT IS CONDITION" for recovery of below mentioned amount due to Equitas Small Finance Bank Ltd., from the following borrowers.

Borrower/s & Guarantor/s Name & Address Total Due + Interest from	Description of the Immovable Property
1. Mrs. Suryakant P Nagvekar, W/o P S Nagvekar, 2. Mrs. Suvarna Narayan Bhagat, W/o Narayan Sonu Bhagat Both are residing at BDD Chwal No 16 Room No 70, N M Joshi Delisle Road, Mumbai, Delisle Road, Mumbai - 400013. Loan Account No. VLPHVSHI0002440: Amount Due Rs.11,96,065/- as on 13-12-2017 as per Demand Notice U/s. 13(2) of SARFAESI Act, 2002, with further interest from 14-12-2017 with monthly rest, charges and costs etc., (Total Outstanding being Rs.3265383/- as on 02-09-2023)	Flat bearing No.202, approximately admeasuring 604 sq.fts. (56.13 sq.mtrs) Built-up area on the Second Floor in Type - A(Building No.7) in a Residential complex with known as "ORCHID G-Wing" on the land described in the First Schedule. Situated within the Sub-Registration of PALHAR and Registration district of THANE.. Together with all buildings and structures attached to the earth or permanently fastened to anything attached to earth, both present and future and all easamentary/mamool rights annexed thereto. **Reserve Price : Rs.10,10,000/- EMD : Rs.1,01,000/- Anant Ramchandra Arolkar- 9969261176 Roshan- 9768427896**
1. Mr. Deepak Prakashchandra Jaju , 2. Mrs. Arti Jaju, (Both are residing at No. A 303, Salasar Clasic Phatak Road, Near Nagar Bhavan, Bhayander West, Bhayander, Thane-401101).Loan Account No.- VLPHBORV0002280 Claim Amount Due Rs. 1671614/- as on 08.12.2017 with further interest from 09.12.2017 with monthly rest, charges and costs etc., (Total Outstanding being Rs.4991713/--as on 02-09-2023).	All the piece and parcel of the premises bearing No. 109, on the 1st Floor, of O.P.Commerce Center Co.op.Hsg.Soc.Ltd., (Reg.No.TNA/(TNA)/HSG/(TC)/16370/2005-2006 at Jesal Park Road, Near Railway Station, Bhayander (E), Dist. Thane Admeasuring 225 Sq.Ft. of Revenue Village Khari, Taluk and Dist. Thane Together with all buildings and structures attached to the earth or permanently fastened to anything attached to earth, both present and future and all easamentary / mamool rights annexed thereto. **Reserve Price: Rs:16,52,400/- EMD : Rs.1,65,240/- Anant Ramchandra Arolkar- 9969261176 Roshan- 9768427896**
1. MR. ANIL SHARDAPRASAD RAJBHAR 2. RS. RAJKUMARI RAJBHAR Both are residing at Flat No.104, Greenveiw Apartment, 1st Floor, Village Sopara, Near Hanuman Temple, Nallasopara (W) Tal. Vasai, Dist. Palghar -401203 Loan Account No.- VLPHBORV0001721 Claim Amount Due Rs.1289006/- as on 05-12-2017 with further interest from 06-12-2017 with monthly rest, charges and costs, etc., (Total Outstanding being Rs.3096407/- as on 02-09-2023).	All the piece and parcel of Flat No.104, Greenveiw Apartment, 1st Floor, Village Sopara, Near Hanuman Temple, Nallasopara (W) Tal. Vasai, Dist. Palghar - 401203. Together with all buildings and structure attached to the earth or permanently fastened to anything attached to earth, both present and future and all easamentary / mamool rights annexed thereto. **Reserve Price: Rs.10,28,500/- Earnest Money Deposit: Rs.1,02,850/- Contact Names:Anant Arolkar: 9969261176 Roshan: 9768427896**
1. MRS. SADHANA VASANT SHEWALE 2. MR. MAHESH PANDURANG MORE Both are residing at R/a Flat No.303, 3rd Floor, Matruchaya, Hissa No.1., Survey No.206, Village Naringi, Virar (E), Tal. Vasai, Dist. Palghar Loan Account No.- VLPHANDR0002839 Claim Amount Due Rs.1228734/- as on 10-12-2017 with further interest from 11-12-2017 with monthly rest, charges and costs, etc., (Total Outstanding being Rs.3431834/- as on 02-09-2023).	All the piece and parcel of Flat No.303, 3rd Floor, Matruchaya, Hissa No.1., Survey No.206, Village Naringi, Virar (E), Tal. Vasai, Dist. Palghar. Together with all buildings and structure attached to the earth or permanently fastened to anything attached to earth, both present and future and all easamentary / mamool rights annexed thereto. **Reserve Price: Rs.15,64,000/- Earnest Money Deposit: Rs.1,56,400/- Contact Names: Anant Arolkar: 9969261176 Roshan: 9768427896**

Date of Auction: 26-09-2023

For detailed terms and conditions of the E-Auction sale, please refer to the link provided in www.equitasbank.com & https://sarfaesi.auctiontiger.net

Date :05.09.2023 **Authorized Officer**
Place:Chennai **Equitas Small Finance Bank Ltd**

संपादकीय

गोविंदा रे गोपाळा!

आज श्रीकृष्ण जयंती आणि उद्या गोपालकालाचा उत्सव सर्व जगभरात साजरा केला जाईल. जन्माष्टमीच्या दिवशी काही घरांमध्ये श्रीकृष्णाचे बालरूपाची विधीवत पूजा होते. तर दुसऱ्या दिवशी दहीहंडी फोडून गोपाळकाला साजरा केला जातो. महाराष्ट्रात गोपाळकाला म्हणजे दहीहंडी करण्याची परंपरा आहे. असे मानले जाते की, बाल कृष्ण व त्यांचे सवंगडी मिळून यमुनेच्या तीरावर गोपाळकाला तयार करून सर्व वाटून खात असत. गोमंतकातील काल्याला गवळण कालासुद्धा म्हटल ा जाते. हे एक मिश्रण पौष्टीक आहार असते, म्हणूनही गोकुळाष्टमीचे महत्व अधिक आहे. कोकणात व महाराष्ट्रात उत्सवानिमित्त दहिकाल ा होतो. या ठिकाणीही हंड्या फोडून तर काही ठिकाणी गोपाळकाल ा होतो. गोकुळाष्टमीचे एक व्रतही सांगितले असून ते केल्याने संतती, संपत्ती व वैकुंठ लोक यांची प्राप्ती होते, असे वयोवृद्ध सांगतात. सुमारे ५००० वर्षांपूर्वी श्रीकृष्ण मथुरेतील कंसाच्या कारागृहात अवतीर्ण झाल ा त्यानंतर त्यांना गोकुळातील नंद महाराज आणि यशोदेच्या महाल ामध्ये स्थलांतरित करण्यात आले. यानिमित्त गोकुळामध्ये श्रीकृष्णाचा जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. या आनंदोत्सवाचे वर्णन करताना तुकाराम महाराज म्हणतात, गोकुळींच्या सुखा । अंत पार नाहीं लेखा ।।१।। बाळकृष्ण नंदाघरिं। आनंदल्या नरनारी ।।२।। गुढिया तोरणे। करिती कथा गाती गाणी ।।३।। तुका म्हणे छंदे। येणे वेधिल ी गोविंदें ।।४।। अर्थात 'श्रीकृष्ण जन्माच्या वेळी त्यांच्या दर्शनाने गोकुळातल्या सुखाला मर्यादाच राहिली नाही. बाळकृष्ण नंद आणि यशोदेच्या घरामध्ये प्रकट झाल्याने सर्व स्त्री-पुरुषांना आनंद झाला. आणखी एका अभंगात श्रीकृष्णजन्माचे वर्णन करताना तुकाराम महाराज म्हणतात, फिरविली दोनी । कन्या आणि चक्रपाणी ।।१।। जाला आनंदी आनंद । अवतरले गोविंद ।।२।। तुटली बंधने । वसुदेव देवकीची दर्शने ।।३।। गोकुळासी आले । ब्रह्म अव्यक्त चांगले ।।४।। नंद दसवंती । धन्य देखीले श्रीपती ।।५।। निशी जन्मकाळ । आले अष्टमी गोपाळ।।६।। आनंदली माही । भार गेला सकळही।।७।। तुका म्हणे कंसा । आठ भोवला वळसा ।।८।। अर्थात 'वसुदेवाने बंदीशाळेत श्रीकृष्णाचा जन्म झाल्यावर त्याला तेथून गुप्तपणे गोकुळात नंद यशोदेच्या घरी नेऊन ठेवले आणि तेथून यशोदेला झालेली कन्या घेऊन ते मथुरेला गेला. गोविंदाने देवकीच्या पोटी जन्म घेतला तेव्हा सर्वत्र आनंदी आनंद झाला. भगवान श्रीकृष्णांचा जन्म हा सामान्य माणसासारखा कर्मबंधनामुळे होत नाही. वास्तविक ज्याप्रमाणे सामान्य जीव एका देहातून दुसऱ्या देहामध्ये प्रवेश करतो त्याप्रमाणे भगवंत आपले शरीर बदलत नाहीत. म्हणून भगवान श्रीकृष्णाच्या जन्माला अवतीर्ण होणे असे म्हणतात. जेव्हा ते अवतीर्ण होतात तेव्हा ते आपल्या अंतरंग शक्तीद्वारे मूळ देहामध्येच अवतीर्ण होतात. भगवंताचे अवतीर्ण होणे आणि अप्रकट होणे हे आकाशात तळपणाऱ्या प्रखर सूर्याप्रमाणे आहे. सूर्य दृष्टीआड झाल्यावर आपल्याला वाटते की सूर्यास्त झाला आणि जेव्हा आपल्या डोळ्यासमोर प्रकट होतो तेव्हा सूर्योदय झाल्यासारखे वाटते. परंतु सत्य हे आहे की सूर्य एकाच ठिकाणी स्थिर असतो. पण आपल्या सदोष आणि अपूर्ण इंद्रियांमुळे आपण सूर्याच्या उदयाची आणि अस्ताची कल्पना करतो. हे समजण्यासाठी भगवान श्रीकृष्ण स्वतःच आपल्या अवतीर्ण होण्याचे वर्णन भगवद्गीतेमध्ये करतात कारण तर्काने किंवा कल्पनेने त्यांचे या भौतिक जगात अवतीर्ण होणे सामान्य जीवांना कळणार नाही. भगवान श्रीकृष्ण भगवद्गीतेमध्ये वेगवेगळ्या श्लोकामध्ये आपल्या दिव्य अवताराबद्दल माहिती देतात. अजोऽपि सन्नव्ययात्मा भूतानामीश्वरोऽपि सन् । प्रकृतिं स्वामधिष्ठाय सम्भवाम्यात्ममायया। (गीता ४.६) अर्थात 'मी जरी अजन्मा आहे आणि माझ्या दिव्य शरीराचा कधीच नाश होत नाही आणि मी जरी सर्व प्राणिमात्रांच्या ईश्वर आहे, तरी प्रत्येक युगायुगात मी माझ्या मूळ दिव्य रूपात अवतीर्ण होत असतो.' जन्म कर्म च मे दिव्यमेवं यो वेत्ति तत्त्वतः । त्यक्त्वा देहं पुनर्जन्म नैति मामेति सोऽर्जुन ।(गीता ४.९) अर्थात 'जो माझ्या जन्माचे आणि कर्माचे दिव्य स्वरूप जाणतो तो देहत्याग केल्यानंतर या भौतिक जगतात पुन्हा जन्म घेत नाही, तर हे अर्जुन, तो माझ्या शाश्वत धामाची प्राप्ती करतो.' अव्यक्तं व्यक्तिमापन्नं मन्यन्ते मामबुद्धयः । परं भावमजानन्तो ममाव्ययमनुत्तमम् ।(गीता ७.२४) अर्थात 'मला पूर्णपणे न जाणणाऱ्या अल्पबुद्धी लोकांना वाटते की, मी (पुरुषोत्तम भगवान श्रीकृष्ण) पूर्वी निराकार होतो आणि आता व्यक्तित्व धारण केले आहे. त्यांच्या अज्ञानामुळे ते माझे अविनाशी आणि अनुपम असे दिव्य स्वरूप जाणू शकत नाही.' नाहं प्रकाशः सर्वस्य योगमायासमावृतः। मूढोऽयं नाभिजानाति लोको मामजमव्ययम् ।(गीता ७.२५) अर्थात 'मूढ आणि अज्ञानी लोकांना मी कधीही प्रकट होत नाही. माझ्या अंतरंगातील शक्तीद्वारे मी त्यांना अप्रकट राहतो आणि म्हणून मी अजन्मा आणि अच्युत असल्याचे ते जाणू शकत नाहीत' अवजानन्ति मां मूढा मानुषीं तनुमाश्रितम् । परं भावमजानन्तो मम भूतमहेश्वरम् । (गीता ९.११) अर्थात 'जेव्हा मी मानवसदृश रूपामध्ये अवतीर्ण होतो, तेव्हा मूर्ख लोक माझा उपहास करतात. अस्तित्वातील सर्व वस्तूंचा परम अधीश्वर म्हणून माझे दिव्य स्वरूप ते जाणत नाहीत'.

वरील काही श्लोकामध्ये आपल्या अवतारकार्याबद्दल सांगतात, त्याचप्रमाणे भगवंत एखाद्या सामान्य बालकाप्रमाणे जरी दिसत असले तरी मूलतः भगवंत हे सर्व सृष्टीचे स्रोत आहेत आणि सर्व आध्यात्मिक आणि भौतिक प्रकृतीचे निर्माण आणि नियंत्रण करतात. भगवद्गीतेमध्ये भगवान श्रीकृष्ण सांगतात, अहं सर्वस्य प्रभवो मत्तः सर्वं प्रवर्तते । इति मत्वा भजन्ते मां बुधा भावसमन्विताः। (गीता १०.८) अर्थात 'मीच सर्व प्राकृत आणि आध्यात्मिक जगतांचा उत्पत्तीकर्ता आहे. सर्व काही माझ्यापासूनच उद्भवते. जे बुद्धिमान मनुष्य हे पूर्णपणे जाणतात ते माझ्या भक्तीमध्ये संलग्न होतात आणि अंतःकरणपूर्वक मला भजतात. मयाध्यक्षेण प्रकृतिः सूयते सचराचरम् । हेतुनानेन कौन्तेय जगद्विपरिवर्तते (गीता ९.१०) अर्थात 'हे कौंतेय! माझ्या अनेक शक्तीपैकी एक असणारी ही भौतिक प्रकृती माझ्या अध्यक्षतेखाली कार्य करीत सर्व चराचर प्राण्यांची निर्मिती करते. तिच्या नियंत्रणाखालीच या सृष्टीची वारंवार उत्पत्ती आणि संहार होतो.'

सारांशाने सांगावयाचे झाल्यास भगवान श्रीकृष्ण ही साधारण व्यक्ती नाही आणि सर्वसाधारण व्यक्ती कधीही श्रीकृष्ण बनू शकत नाही. अशा श्रीकृष्णांना केवळ त्यांच्यावर प्रेम करणारे शुद्ध भक्तच समजू शकतात. संत तुकाराम आपल्या काही अभंगातून अशा अद्भुत श्रीकृष्णाबद्दल म्हणतात अनंत ब्रह्मांडे उदरी । हरी हा बालक नंदाघरिं ।।१।। नवल केव्हढे केव्हढे । न कळे कान्होबाचे कोडे ।।२।। पृथ्वी जेणे तृप्त केल ी। त्यासी यशोदा भोजन घाली ।।३।। विश्वव्यापक कमळापती । त्यासी गौळणी कडिये घेती ।।४।। तुका म्हणे नटधारी । भोग भोगूनि ब्रह्मचारी ।।५।। अर्थात 'ज्याच्या उदरी अनंत ब्रह्मांडे स्थित आहेत, तो हरी नंदाच्या घरी एखाद्या बालकाप्रमाणे खेळत आहे ही केवढी नवलाची गोष्ट आहे, या कृष्णाचे लाघव कोणालाही समजत नाही. ज्याने सर्व पृथ्वी तृप्त केली, त्याला यशोदा आपल्या हाताने घास भरविते, जो कमळापती विश्वव्यापक आहे, त्याला गौळणी कडेवर घेतात. अशा या श्रीकृष्णाच्या जन्मोत्सवात सर्वांनी सहभागी होऊन गोकुळीचा आनंद कसा प्राप्त करावा याबद्दल तुकाराम महाराज म्हणतात, कृष्ण गोकुळी जन्मला । दुष्टां चळकांप सुटला ।।१।। होता कृष्णाचा अवतार । आनंद करिती घरोघर ।।२।। सदा नाम वाचे गाती । प्रेमे आनंदी नाचती ।।३।। तुका म्हणे हरती दोष । आनंदानें करिती घोष ।।४।। अर्थात 'गोकुळात श्रीकृष्ण जन्मला हे ऐकून दुष्ट लोकांचा थरकाप उडाला. श्रीकृष्ण अवतीर्ण झाल्यावर सात्विक लोक घरोघरी उत्सव साजरा करू लागले, उच्च स्वरात श्रीकृष्णाच्या नामाचा गजर करू लागले आणि प्रेमानंदाने नृत्य करू लागले. जे हरिनामाची गर्जना करतात व आनंदाने नाचतात त्यांचे सर्व दोष निवारण होतात. गोपालकृष्ण महाराज की जय।।

गोल्डन बॉयची गोल्डन कामगिरी

श्याम ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे

भारताचा गोल्डन बॉय ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेता भालाफेकपटू नीरज चोप्राने देशाचा शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. नुकत्याच झालेल्या जागतिक एथलेटिक्स चॅम्पियनशिप स्पर्धेत त्याने ८८.७७ मीटर अंतरावर भाला फेकून सुवर्णपदकाला गवसणी घातली. त्याची ही कामगिरी ऐतिहासिक अशीच आहे कारण या स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणारा तो केवळ दुसराच भारतीय आहे. यायाधी अशी कामगिरी अभिनय बिंद्राने याने केली होती. त्याच्या या सुवर्ण कामगिरीने देशाची मान अभिमानाने उंचावली आहे. देशाला याची आता सवयच झाली आहे. नीरज चोप्रा आणि सुवर्णपदक हे आता समीकरणच बनले आहे. तो ज्या स्पर्धेत भाग घेतो त्या स्पर्धेत तो देशासाठी सुवर्णपदक जिंकतो. आता हेच पहा ना जुलै महिन्यात झालेल्या लॉसने डायमंड लीग स्पर्धेतही त्याने पहिलं स्थान पटकावलं होतं. त्याने तिथे ८७.६६ अंतरावर भालाफेकून पहिलं स्थान पटकावलं होत. आता त्याने त्यापेक्षाही सरस कामगिरी केली आहे. अर्थात अशी सुवर्ण कामगिरी त्याने याआधी दोन वर्षांपूर्वी टोकियो ऑलिंपिकमध्येही केली होती. त्यावेळीही त्याने विक्रमी भालाफेक करून देशासाठी सुवर्णपदक जिंकून इतिहास घडवला होता. विशेष म्हणजे एथलॅटीक्समध्ये भारताला मिळालेले हे पहिलेच पदक होते. याआधी मिल्खा सिंग, पी टी उषा हे पदकाच्या जवळ पोहचूनही पदकाला गवसणी घालू शकले नव्हते ती किमया नीरजने करून दाखवली होती. भारतासाठी ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक आणि डायमंड लीग आणि आता जागतिक एथलेटिक्स स्पर्धा जिंकणाऱ्या नीरज चोप्राचा जन्म २७ डिसेंबर १९९७ ला हरियाणातील पानिपत जिल्ह्यातील खांद्रा या छोट्याशा गावात एका सर्वसामान्य शेतकरी कुटुंबात झाला. त्याचे शिक्षण चंदीगड येथे झाले. लहानपणापासून त्याला खेळाची आवड होती. त्याचे वजन ८० किलो होते त्यामुळे गावातील लोक त्याला सरपंच म्हणत. कुस्ती, कबड्डी असे खेळ त्या गावातील मुले खेळत पण नीरजने मात्र भालाफेक या खेळाची निवड केली. विशेष म्हणजे त्याच्या गावात कोणीही भालाफेक हा खेळ खेळत नव्हते. भाला फेक हा खेळ जागतिक स्तरावर खेळला जातो हे देखील त्या गावातील काही लोकांना माहीत नव्हते त्यामुळे अनेकांनी त्याला भालाफेक सोडून कुस्ती हा खेळ खेळण्यास सांगितले. नीरजने मात्र त्याकडे दुर्लक्ष करून भालाफेकीतच करियर करायचे आणि देशाचे नाव उज्ज्वल करायचे असा निश्चय केला. त्यासाठी त्याने तंदुरुस्तीवर भर दिला. खूप प्रयत्न करून स्वतःचे वजन कमी केले. भालाफेकीचा दररोज सराव केला. खेळात सातत्य ठेवले आणि दिवसेंदिवस चांगली कामगिरी केली. राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत चांगली कामगीरी केल्याने २०१६ साली दिल्लीत झालेल्या आशिआई स्पर्धेत भारतीय पथकात त्याची निवड झाली. आपल्या या पहिल्याच आंतरराष्ट्रीय स्पर्धेत त्याने भारताला सुवर्णपदक मिळवून दिले. त्यानंतर २०१६ मध्येच पोलंडमध्ये झालेल्या २० वर्षाखालील वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये ८४. ४८ मीटर दूर भाला फेकून सुवर्णपदक मिळवले. अंजु बॉबी जॉर्ज नंतर आंतरराष्ट्रीय स्पर्धेत एथलॅटीक्समध्ये भारताला पदक मिळवून देणारा नीरज हा दुसराच भारतीय खेळाडू ठरला होता. एकाच वर्षात दोन महत्वाच्या स्पर्धेत सुवर्णपदक जिंकल्याने त्याचे जगभर नाव झाले. या कामगिरीनंतर नीरजची भारतीय सेनेत ज्युनियर कंडिशन ऑफिसर म्हणून नेमणूक करण्यात आली. २०१८ साली जकार्ता येथे झालेल्या एशियन गेम्समध्ये त्याने ८८.०७ मीटर भाला फेकून राष्ट्रीय विक्रमासह सुवर्णपदक जिंकले. सतत चांगली कामगिरी करणाऱ्या नीरजला २०१९ मध्ये मात्र दुखापतीने घेरले. त्याच्या खांद्यावर शस्त्रक्रिया करावी लागली त्यामुळे त्याला काही महिने खेळापासून दूर राहावे लागले. २०२० साली जगभर कोरोनाचा प्रादुर्भाव वाढला त्यामुळे त्याला सक्तीची विश्रांती घ्यावी लागली. त्यामुळे त्याच्या ऑलिम्पिक तयारीवरही मोठा परिणाम झाला असे असतानाही या ऑलिम्पिकमध्ये भारताला पदक मिळवून द्यायचेच या निश्चयाने तो मैदानात उतरला. पहिल्या प्रयत्नातच त्याने ८७.०३ मीटरवर भाला फेकून आघाडी मिळवली. दुसऱ्या प्रयत्नात नीरजने ८७.५८ मीटर भाला फेकत पहिल्या प्रयत्नाच्या तुलनेत सुधारणा केली तिसऱ्या प्रयत्नात नीरजचा भाला ७६.७९ मीटरवर गेला. त्याचा चौथा आणि पाचवा प्रयत्न मात्र अवैध ठरला. मात्र बाकी स्पर्धकांची कामगिरी सर्वसाधारण राहिली त्यामुळे नीरजची आघाडी कायम राहिली. सहाव्या प्रयत्नात नीरजने ८४.२४ मीटर अंतरावर भाला फेकून सुवर्णपदकाला गवसणी घातली. त्याचे सुवर्णपदक निश्चित झाले की देशवासीयांनी दिवाळीच साजरी केली होती आजही तोच उत्साह देशवासीयांमध्ये आहे. लॉसने डायमंड लीग स्पर्धेनंतर आता जागतिक एथलेटिक्स स्पर्धेतही त्याने सुवर्ण कामगिरी केली आहे. एका वर्षात सलग दोन मोठ्या स्पर्धेत देशासाठी सुवर्णपदक जिंकणाऱ्या या गोल्डन बॉयच्या यशाने देशातील १४० कोटी देशवासियांची छाती अभिमानाने फुगली आहे. गोल्डन बॉय नीरज चोप्राचे मनापासून अभिनंदन!

सर्पदंश झाल्यास कसा कराल प्रथमोपचार?

जागतिक सर्प दिवस दरवर्षी १६ जुलै रोजी आहे. या दिवशी, आम्ही जगभरातील विविध प्रकारच्या सापांच्या प्रजातींविषयी जागरूकता वाढवण्यासाठी साजरा केला जातो. बरेच लोक सापांना घाबरतात मात्र तरीही साप हा एक महत्त्वाचा प्राणी आहे. आपल्या पर्यावरणात त्यांची महत्त्वाची भूमिका आहे. याशिवाय जागतिक सर्प दिनानिमित्त लोक विविध प्रकारचे साप आणि त्यांना सुरक्षित कसे ठेवायचे याबद्दल सांगतात. अशा परिस्थितीत आज आम्ही तुम्हाला सांगत आहोत की, सर्पदंश झाल्यास प्रथमोपचार काय केले पाहिजेत.

साप चावल्यावर हे प्रथमोपचार घ्या

१. ज्या ठिकाणी तुम्हाला साप चावला असेल त्या ठिकाणाहून दूर जा. जर साप तिथे असेल तर तो पुन्हा तुमच्यावर हल्ला करू शकतो. २. ताबडतोब ९११ वर फोन करा आणि साप चावल्याची वेळ लक्षात ठेवा. ३. शरीराच्या चावलेल्या भागाभोवती तुम्ही घातलेली कोणतीही वस्तू जसं की, अंगठ्या, अँकलेट, बांगड्या काढून टाका. कारण त्यांना सूज आल्यास नुकसान होऊ शकतं. ४. साप चावल्यानंतर शांत आणि स्थिर राहा, कारण हालचालीमुळे सापाचे विष शरीरात अधिक वेगाने पसरू शकते. ५. साप चावला असेल तर पायी चालू नका. गाडीच्या मदतीने साहाय्याने ताबडतोब हॉस्पिटलमध्ये जा. ६. साप चावल्यानंतर उलट्या होऊ शकतात, म्हणून व्यक्तीला झोपून ठेवा.

प्रथमोपचाराबद्दल नागरिकांमध्ये असलेले संभ्रम

साप चावल्यानंतर अनेक जुने प्राथमिक उपचार आहेत, जे हानिकारक मानले जातात. त्यामुळे हे उपचार करणं टाळा. चाव्यावर कोल्ड कॉम्प्रेस वापरू नका. डॉक्टरांच्या सूचनेशिवाय व्यक्तीला कोणतंही औषध देऊ नका. तोंडाच्या सहाय्याने विष काढण्याचा प्रयत्न करू नका. तसंच पंप सक्शन उपकरण वापरू नका.

अनुरूप पॅकेजिंग लिमिटेड

सीआयएन क्रमांक : एल २५२०२ एम एच १९९५ पीएलसी ०९३६२५
नोंदणीकृत कार्यालय : आंबिस्ते (बीके), पोस्ट खाणी, तालुका वाडा, पालघर महाराष्ट्र, ४२१ ३०३ **दूरध्वनी क्रमांक :** ०२२- ४९२४०१८२/ ८३
इ मेल : info@anurooppackaging.com **संकेतस्थळ :** http://anurooppackaging.com/

२८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना आणि इ मतदान माहिती

याद्वारे सूचित करण्यात येते की कंपनीची २८ वि वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) **बुधवार दिनांक २७ सप्टेंबर २०२३ रोजी संध्याकाळी ५. ००** वाजता गोल्डन चारियाट, पश्चिम द्रुतगती महामार्ग, एन एच ८, वसई ठाणे, महाराष्ट्र ४०१ २०८ येथे वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेत नमूद केल्यानुसार विषयांच्या अनुरूप घेण्यात येणार आहे. कंपनीने वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना दिनांक ०५ सप्टेंबर २०२३ रोजी इलेक्ट्रॉनिक माध्यमातून अशा सभासदांना निर्गमित केली आहे ज्या सभासदांचे इ मेल तपशील कंपनी / डिपॉझिटरीज यांच्याकडे नोंदणीकृत आहेत आणि ही प्रक्रिया कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय यांनी जारी केलेले परिपत्रक दिनांकीत ०५ मे २०२० तसेच त्यासह वाचा परिपत्रक दिनांकीत ०८ एप्रिल २०२० आणि १३ एप्रिल २०२० (यापुढे ज्यांचे एकत्रित उल्लेख एमसीए परिपत्रके असा करण्यात येणार आहे) आणि सेबी परिपत्रक दिनांकीत १२ मे २०२० च्या अनुसार पूर्ण करण्यात आली आहे.

वित्तीय वर्ष २०२२- २३ करिताचा वार्षिक अहवाल कंपनीचे संकेतस्थळ http://anurooppackaging.com/ येथे तसेच स्टॉक एक्स्चेंज यांचे संकेतस्थळ म्हणजेच बीएसई लिमिटेड यांचे संकेतस्थळ म्हणजेच www.bseindia.com आणि केफिनटेक यांचे संकेतस्थळ https://evoting.kfintech.com येथे उपलब्ध करून देण्यात आला आहे आणि तेथूनच तो डाउनलोड करता येईल. कंपनी कायदा २०१३ कलम १०८ च्या तरतुदींच्या अनुसार तसेच त्यासह वाचा कंपनीज (मॅनेजमेंट अँड ॲडमिनिस्ट्रेशन) नियम २०१४ चा नियम २० तसेच त्यात वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांच्या अनुसार आणि सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) नियम २०१५ च्या नियम ४४ अनुसार वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेत नमूद केलेल्या प्रस्तावांवर मेसर्स केफिन टेक्नॉलॉजी प्रायव्हेट लिमिटेड (केफिनटेक) यांनी उपलब्ध करून दिलेल्या इ मतदान सुविधेच्या माध्यमातून (इ मतदान) इलेक्ट्रॉनिकली मतदान करण्याची सुविधा सभासदांना उपलब्ध करून देण्यात येत आहे. सभासदांचे मताधिकार हे कट ऑफ तारीख म्हणजेच बुधवार दिनांक २० सप्टेंबर २०२३ (कट ऑफ तारीख) रोजी कंपनीच्या एकूण पेड अप समभाग भांडवलात सभासदांकडे उपलब्ध असलेल्या इक्विटी समभागांच्या संख्येवर अवलंबून असतील.

दूरस्थ इ मतदान कालावधीला मंगळवार दिनांक २३ सप्टेंबर २०२३ रोजी सकाळी ९. ०० वाजता प्रारंभ करण्यात येईल आणि ही प्रक्रिया दिनांक २६ सप्टेंबर २०२३ रोजी संध्याकाळी ०५. ०० वाजता संपुष्टात येईल. या कालावधीत सभासद इलेक्ट्रॉनिकली आपला मतदानाचा हक्क बजावू शकतात. त्यानंतर दूरस्थ इ मतदान प्रारूप मतदानासाठी मेसर्स केफिन टेक्नॉलॉजी प्रायव्हेट लिमिटेड (केफिनटेक) यांच्याकडून बंद करण्यात येईल. जे सभासद वार्षिक सर्वसाधारण सभेला उपस्थित असतील आणि ज्यांनी वार्षिक सर्वसाधारण सभेच्या पूर्वी दूरस्थ इ मतदानपद्धतीने मतदान केलेले नाही किंवा त्यांना तसे करण्यास मनाई करण्यात आलेली नाही ते सभासद वार्षिक सर्वसाधारण सभेच्या दरम्यान मतपत्रिकेच्या माध्यमातून मतदान करण्यासाठी पात्र असतील.

ज्या सभासदांनी वार्षिक सर्वसाधारण सभेच्या पूर्वी दूरस्थ इ मतदान पद्धतीने मतदान केलेले आहे असे सभासद वार्षिक सर्वसाधारण सभेला उपस्थित राहू शकतात मात्र त्यांना वार्षिक सर्वसाधारण सभेच्या दरम्यान पुन्हा मतदान करता येणार नाही.

अशी कोणतीही व्यक्ती, जी वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना निर्गमित करण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर कंपनीचे समभाग घेऊन कंपनीची सभासद झालेली आहे आणि कट ऑफ तारीख रोजी तिच्याकडे कंपनीचे समभाग आहेत तर अशी व्यक्ती evoting@kfintech.com येथे विनंती पाठवून लॉग इन आयडी आणि पासवर्ड प्राप्त करू शकते. मात्र जर अशी व्यक्ती या आधीच इ मतदानासाठी मेसर्स केफिन टेक्नॉलॉजी प्रायव्हेट लिमिटेड (केफिनटेक) यांच्याकडे नोंदणीकृत असेल तर ती / तो व्यक्ती आपला सध्याचा युजर आयडी आणि पासवर्ड यांचा वापर मतदानासाठी करू शकते. सामान्य परिपत्रक क्रमांक २०/ २०२०, १४/ २०२०, १७/ २०२० आणि लागू असलेली अन्य परिपत्रके जी कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय (एमसीए), भारत सरकार) आणि सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) यांनी जारी केली आहेत, त्यांच्या अनुसार वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना आणि वित्तीय वर्ष २०२२- २३ साठीचा वार्षिक अहवाल यांच्या इलेक्ट्रॉनिक प्रति केवळ अशा सभासदांना निर्गमित करण्यात येणार आहेत ज्या सभासदांचे इ मेल तपशील कंपनी / डिपॉझिटरी प्रतिसंपर्क्स यांच्याकडे नोंदणीकृत आहेत. ज्या सभासदांकडे कंपनीचे समभाग डिमॅट स्वरूपात उपलब्ध आहेत त्यांना आवाहन करण्यात येते की आपला इ मेल तपशील, मोबाईल क्रमांक त्यांचे संबंधित डिपॉझिटरीज यांच्याकडे डिपॉझिटरी पार्टीसिपंट्स यांच्या माध्यमातून नोंदणीकृत करून घ्यावा. ज्या सभासदांकडे कंपनीचे समभाग प्रत्यक्ष स्वरूपात आहेत त्यांना आवाहन करण्यात येते की त्यांनी आपला इ मेल तपशील आणि मोबाईल क्रमांक कंपनी रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्स्फर एजंट्स मेसर्स केफिन टेक्नॉलॉजी प्रायव्हेट लिमिटेड (केफिनटेक) यांच्याकडे नोंदणीकृत करावा. दूरस्थ इ मतदान प्रक्रियेचा तपशील जाणून घेण्यासाठी कृपया वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेचा संदर्भ घ्यावा.

वार्षिक सर्वसाधारण सभेला उपस्थित राहण्याच्या संदर्भात किंवा इ मतदानाच्या संदर्भात कोणत्याही शंका किंवा प्रश्न असल्यास आपण https ://evoting.kfintech.com या संकेतस्थळावर डाउनलोड विभागात उपलब्ध असलेले हेल्प आणि फ्रिक्वेंटली आस्क्ड क्वेश्चन्स आणि इ मतदान युजर मॅन्युअल यांचा संदर्भ घेऊ शकता. किंवा श्री उमेश पांडे, व्यवस्थापक (युनिट अफल इंडिया लिमिटेड) मेसर्स केफिन टेक्नॉलॉजी प्रायव्हेट लिमिटेड (केफिनटेक) . सेलेनियम टॉवर बी, प्लॉट क्रमांक ३१ आणि ३२, फिनान्शियल डिस्ट्रिक्ट, नानाक्रम गुडा, सेरीलिंगमपल्ली मंडळ, हैदराबाद ५०० ०३२ तेलंगणा भारत येथे किंवा einward.ris@kfintech.com आणि evoting@kfintech.com येथे किंवा केफिन यांचा टोलफ्री क्रमांक १- ८०० ३४५४ ००१ येथे अधिक स्पष्टीकरणाची संपर्क साधू शकता.

अनुरूप पॅकेजिंग लिमिटेड यांच्या करिता
स्वाक्षरी / -
आकाश अमरनाथ शर्मा
व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन : ०६३८९९०२

स्थळ : ठाणे
दिनांक : ०७ सप्टेंबर २०२३

युनियन बँक ऑफ इंडिया (शाखा - लोखंडवाला कॉम्प्लेक्स कांदिवली पूर्व)
दुकान क्र. 63, 64, 65, सेंट्रिअम शॉपिंग सेंटर,
दूर. क्र. 022-29650010
ईमेल आयडी : ubin0569674@unionbankofindia.bank

सेक्शन 13(2) अंतर्गत मागणी सूचना

संदर्भ : ओआर/लोखंडवाला/एनपीए/2023-24/05 दि. 24.07.2023
ठिकाण : कांदिवली पूर्व

प्रति,
1. **श्री. भास्कर रामनाथ अव्हाड (कर्जदार)**
सी विभाग रूम क्र. 329ए बीएमसी कॉलनी हनुमान नगर, गोरेगाव पूर्व मुंबई 400 065.
1. ए. **श्री. भास्कर रामनाथ अव्हाड (कर्जदार)**
युनिट क्र. 1106, 11 वा मजला, जे विंग, बिल्डींग कासा एलाईट, खिकलेश्वर जवळ, कल्याण शीळ रोड, डोंबिवली 421 203.
2. **श्रीम. सत्यभामा बी. अव्हाड (सह-कर्जदार)**
सी विभाग रूम क्र. 329ए बीएमसी कॉलनी हनुमान नगर, गोरेगाव पूर्व मुंबई 400 065.
2. ए. **श्रीम. सत्यभामा बी. अव्हाड (सह-कर्जदार)**
युनिट क्र. 1106, 11 वा मजला, जे विंग, बिल्डींग कासा एलाईट, खिकलेश्वर जवळ, कल्याण शीळ रोड, डोंबिवली 421 203.

महोदय/ महोदया

विषय : सीक्युरिटायझेशन अँन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शीअल असेट्स अँन्ड एन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट अंक्ट, 2002 च्या अनुच्छेद 13(2) सहवाचन अनुच्छेद 13(3) अंतर्गत सूचना

आम्ही तुम्हाला क्र. 1 व 2 यांना सूचित करतो की, तुमचे खाते आमच्या कांदिवली पूर्व शाखा यांच्याकडून पत सुविधा प्राप्त करत आहोत व दि. **29.05.2023** अनुसार तुमचे कर्ज खाते अकार्यरत मालमत्ता म्हणून वर्गीकृत करण्यात येत आहे कारण तुम्ही थकित/ इन्स्टॉलमेंट/ व्याज यांचे प्रदान करण्यास कसूर केली आहे. दि.**30.06.2023** पासून रक्कम **रु. 25,95,381.42 (रु. पंचवीस लाख पंच्याण्णव हजार तीनशे एक्याऐंशी व बेचाळीस पैसे मात्र)** चे प्रदान तुमचे खाते वा निर्देशित खाते अनुसार थकबाकीचे प्रदान करावे.

तुम्ही बँक खाते क्र.चे विवरण सदर खात्याच्या संबंधात अंमलात आणत आहोत :

सुविधांचे प्रकार	दि. 30.06.2023 पासून थकित रक्कम	दि. 01.07.2023 पासून अलागू व्याज	दंडात्मक व्याज (सामान्य)	मूल्य/ प्रभार बंकेद्वारे उद्ववलेले	एकूण थकबाकी
गृह कर्ज 696706650000032	रु. 25,95,381.42	-	-	-	रु. 25,95,381.42
				एकूण थकबाकी	**रु. 25,95,381.42**

तुम्हाला वारंवार मागणी सूचना देऊनही तुम्ही तुमच्या दायित्वांचे प्रदान करण्यास कसूर केली आहे व बंक **भास्कर रामनाथ अव्हाड व सत्यभामा बी. अव्हाड** यांना दि. 15.07.2014पासून तुमचे खाते/ खाते थकित रक्कमेचे असल्याने तुम्ही प्रदान करावे.

गहाण - स्थावर मालमत्तेचे विवरण खालीलप्रमाणे

मालमत्ता युनिट क्र. 1106, 11 वा मजला, जे विंग, मोजमापित क्षेत्र 500 चौ. फूट (चटई क्षेत्रफळ) कार पार्किंग जागा 1 (चार चाकी) बिल्डींग कासा इलाईट म्हणून ज्ञात, प्रोजेक्ट नाव लेकशोअर ग्रीन्स-कासा इलाईट म्हणून ज्ञात खिडकेश्वर जवळ, टी एम्पल कल्याण, शिळ रोड, डोंबिवली, महाराष्ट्र 421 203 जमिन धारक सर्वहे क्र. 92, 93/1, 2, 95/3, 150/2ए, 150/2बी, 95/3, 150/3, 150/4ए + 4बी, 97, 96/2ए धारक गाव खोणी.

त्यामुळे, तुम्हाला याद्वारे सीक्युरिटायझेशन अँन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शीअल असेट्स अँन्ड एन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट अंक्ट, 2002 च्या अनुच्छेद 13(2) अंतर्गत रक्कम **रु. 25,95,381.42 (रु. पंचवीस लाख पंच्याण्णव हजार तीनशे एक्याऐंशी व बेचाळीस पैसे मात्र)** चे प्रदान तुमचे खाते वा निर्देशित खाते अनुसार थकबाकीचे प्रदान करावे. त्यावरील व्याज व प्रभार कंत्राटी दराने सूचनेच्